# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

( पूर्वीचे पुणे विद्यापीठ )

## परिपत्रक

**विषय: सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नित महाविद्यालये (अव्यवसायिक)/विद्यापीठ विभागातील विद्यार्थ्यांसाठी विविध शिष्यवृत्ती योजना शैक्षणिक वर्ष २०२१–२२ साठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज पाठविण्याच्या मुदतवाढीबाबत.**

विद्यापीठ संलग्नित महाविद्यालय/विद्यापीठ विभागातील पदवी व पदव्युत्तर अव्यवसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या आर्थिक दुर्बल घटक, गुणवत्ताधारक, मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठामार्फत उपरोक्त शिष्यवृत्ती/अर्थसहाय्य योजना सुरू केलेल्या आहेत. सदर योजनांतर्गत शैक्षणिक वर्ष २०२१–२२ या वर्षात प्रवेशित विद्यार्थी/विद्यार्थीनी यांच्याकडून संबंधित महाविद्यालय/विद्यापीठ विभाग यांच्यामार्फत ऑनलाईन **(Online)** पध्दतीने दि. ११ फेब्रुवारी, २०२२ पर्यत अर्ज करण्याबाबत विद्यापीठ परिपत्रक क्र. १८/२०२२ दि. १९/०१/२०२२ अन्वये कळविण्यात आले होते.

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना पुनःश्च कळविण्यात येते की, ज्या महाविद्यालय / संस्थांनी अद्यापही त्यांच्या महाविद्यालयातील ज्या विद्यार्थ्यांने अर्ज भरले नसेल अशा पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती/अर्थसहाय्य योजनेसाठी **दि. <u>२८/०२/२०२२</u>** पर्यत ऑनलाईन **(Online)** पध्दतीने अर्ज करण्यास सूचित करावे. तसेच महाविद्यालय/विद्यापीठ विभागाने विद्यार्थ्यांनी ऑनलाईन **(Online)** पध्दतीने भरलेल्या अर्जांची छाननी करून आपल्या महाविद्यालयाच्या **PUNCODE** वरून **दि. <u>०४/०३/२०२२</u>** पर्यंत Online पद्धतीने विद्यापीठास सादर करावी.

यापुढे याकरीता कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

(स्वाक्षरी)
**उपकुलसचिव**
**शैक्षणिक प्रवेश**

गणेशखिंड, पुणे – ४११००७
संदर्भ : शै. प्रवेश/९४५
दिनांक : २४/०२/२०२२

प्रत : माहिती व योग्य त्या कार्यवाही करीता

मा. विभागप्रमुख, विद्यापीठ विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

मा. प्राचार्य, विद्यापीठाशी सलंग्नित सर्व अव्यवसायिक महाविद्यालय.

आपणास विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या महाविद्यालयातील सर्व संबंधित विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देऊन विहित मुदतीत आवश्यक कार्यवाही करण्यात यावी.

E:/Desktop/Pro-Rata Circular2021-22

Scanned by CamScanner